# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

# छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

• संपादक •
डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | **छत्रपती शिवाजी महाराजांचा उद्योग व व्यापारासंदर्भातील दृष्टिकोन**<br>- डॉ. मीना वडगुळे | १ - ३ |
| २. | **छ. शिवाजी महाराजांचे अमात्य व जकातविषयक धोरण**<br>- डॉ. सुनील अण्णा गोरडे | ४ - ७ |
| ३. | **सभासद बखरीतील छत्रपती शिवाजी महाराज**<br>- डॉ. रमेश औताडे | ८ - १० |
| ४. | **छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन**<br>- प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे | ११ - १३ |
| ५. | **छत्रपती शिवाजी महाराजांचे बांधकाम व राजस्व धोरण : एक चिकित्सक अभ्यास**<br>- डॉ. ज्ञानेश्वर जिगे | १४ - १६ |
| ६. | **छत्रपती शिवाजी महाराजांचा सामाजिक दृष्टिकोन**<br>- डॉ. सतीश मस्के | १७ - २० |
| ७. | **श्री छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी कविता**<br>- डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत | २१ - २४ |
| ८. | **शिवकालीन समाजव्यवस्थेचा समाजशास्त्रीय अभ्यास**<br>- प्रा. डॉ. संजय गंगाराम सुरेवाड | २५ - २९ |
| ९. | **छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर**<br>- प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर | ३० - ३४ |
| १०. | **न्यायप्रिय राजा : छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य**<br>- प्रा. डॉ. दादासाहेब गिऱ्हे | ३५ - ३७ |
| ११. | **छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर**<br>- प्रा. डॉ. वाल्मीक शंकर आढावे | ३८ - ४१ |
| १२. | **शिवाजी महाराजांची युद्धनीती**<br>- प्रा. योगेश गुलाबराव भदाणे | ४२ - ४४ |
| १३. | **छत्रपती शिवाजी महाराज व्यक्तित्व आणि कार्य**<br>- डॉ. विठ्ठल केदारी | ४५ - ४८ |
| १४. | **छत्रपती शिवाजी महाराजांची आरमारविषयक भूमिका**<br>- डॉ. भूषण गोविंद फडतरे | ४९ - ५४ |
| १५. | **छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन**<br>- प्रा. पालवे रामनाथ सूर्यभान | ५५ - ५८ |

| | | |
|---|---|---|
| १६. | लोकशाही मूल्यांचे उपासक - छत्रपती शिवाजी महाराज<br>- डॉ. बाबासाहेब त्रिंबक मोताळे | ५९ - ६३ |
| १७. | छत्रपती शिवाजी महाराज यांचे 'आरमार'विषयक धोरण – आज्ञापत्रकृत<br>- प्रा. राधाकिसन पांडुरंग मुठे | ६४ - ६६ |
| १८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा मानवतावादी दृष्टिकोन<br>- अजित जयराम जाधव | ६७ - ६८ |
| १९. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्वराज्यविषयक दृष्टिकोन<br>- प्रा. जगदीश रामभाऊजी वाटमोडे | ६९ - ७२ |
| २०. | छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकीय कर्तृत्व<br>- डॉ. सीता ल. केंद्रे | ७३ - ७५ |
| २१. | छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमार<br>- प्रा. महेश शिवाजीराव जाधव | ७६ - ७८ |
| २२. | शिवरायांचे कृषी धोरण आणि महसूल व्यवस्था - एक अभ्यास<br>- डॉ. रावसाहेब भीमराव नेरकर | ७९ - ८० |
| २३. | छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती<br>- प्रा. धर्मदास वी. घोडेस्वार | ८१ - ८४ |
| २४. | छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासनविषयक भूमिका<br>- प्रा. विजय शामराव कांडलकर | ८५ - ८८ |
| २५. | छत्रपती शिवाजी महाराज : साहित्यातील प्रतिमा आणि इतिहास<br>- प्रशांतकुमार प्रल्हाद डोंगरदिवे | ८९ - ९१ |
| २६. | शिवाजी महाराजांच्या आरमार उभारणीत बसरूरच्या स्वारीचे महत्त्व<br>- प्रा. डॉ. भानुसे कारभारी लक्ष्मण | ९२ - ९५ |
| २७. | शिवपूर्वकालीन व शिवकालीन ग्रामीण जीवन<br>- प्रा. देवीदास भटू भामरे | ९६ - ९९ |
| २८. | छत्रपती शिवाजी महाराज : कर्तृत्व<br>- प्रा. डॉ. संजय राजधर महाले | १०० - १०४ |
| २९. | शिवशाहीवरील वसंत कानेटकरांचे ऐतिहासिक नाट्यपंचक<br>- प्रा. डॉ. प्रफुल्ल टी. बन्सोड | १०५ - ११० |
| ३०. | शिवकालीन निवडक बखरी<br>- डॉ. रमेश बलभीम जाधवर | १११ - ११३ |
| ३१. | सभासद बखरीमधील अफजलखान वध<br>- प्रा. डॉ. आशा सोपान गिरी | ११४ - ११६ |

| | | |
|---|---|---|
| ३२. | छ. शिवाजी महाराजांच्या पत्रातील पर्यावरण<br>- प्रा. डॉ. म. ई. तंगावार | ११७ - ११८ |
| ३३. | शिवाजी महाराजांच्या संदर्भातील हिंदी साहित्य व संशोधनातील नोंदी<br>- डॉ. संदीप जोतिराम भुयेकर | ११९ - १२३ |
| ३४. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- दीपक शिवदास पाटील | १२४ - १२७ |
| ३५. | छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकीय कर्तृत्व<br>- बाबासाहेब पांडुरंग लबडे | १२८ - १३१ |
| ३६. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर<br>- प्रा. डॉ. भैया डी. पाटील | १३२ - १३५ |
| ३७. | शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय देणारे 'आज्ञापत्र'<br>- प्रा. उगम उमेश परब | १३६ - १३८ |
| ३८. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- प्रा. डॉ. विनायक पवार व प्रा. कृष्णा नागरे | १३९ - १४२ |
| ३९. | 'सभासदाची बखर' यातून चित्रित झालेले शिवरायांचे चरित्र<br>- प्रा. डॉ. जगताप यू. एस. | १४३ - १४५ |
| ४०. | शिवाजी महाराजांची पर्यावरणनीती : एक चिंतन<br>- डॉ. राजेश्वर दिनकर रहांगडाले | १४६ - १४९ |
| ४१. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- प्रा. डॉ. संगीता मोरे | १५० - १५३ |
| ४२. | भारतीय आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज<br>- प्रा. सखाराम बाबाराव कदम | १५४ - १५८ |
| ४३. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी साहित्य<br>- डॉ. रामलीला सुदामराव पवार | १५९ - १६२ |
| ४४. | शिवकालीन कागद - एक चिकित्सक अभ्यास<br>- प्रा. डॉ. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा | १६३ - १६६ |
| ४५. | छत्रपती शिवाजी महाराज आणि कला व स्थापत्य<br>- डॉ. नामदेव विठ्ठल शिंदे | १६७ - १७० |
| ४६. | छत्रपती शिवाजी महाराजांची धर्मनीती<br>- प्रा. डॉ. प्रदीप महादेव जगताप | १७१ - १७५ |
| ४७. | महात्मा फुले आणि कुळवाडीभूषण शिवाजीराजे<br>- जी. ए. उगले | १७६ - १७८ |

| | | |
|---|---|---|
| ४८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा सामाजिक दृष्टिकोन<br>- प्रा. डॉ. विजय पाटील | १७९ - १८१ |
| ४९. | छत्रपती शिवाजी महाराज : कर्तृत्व<br>- प्रा. डॉ. दिनेश भा. कोलते | १८२ - १८५ |
| ५०. | छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती : एक अभ्यास<br>- प्रा. दत्तात्रय गणेश जगताप | १८६ - १९० |
| ५१. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- प्रा. डॉ. प्रतिभा अहिरे व प्रा. सिल्केषा अहिरे | १९१ - १९४ |
| ५२. | 'प्रतिपश्चंद्र' कादंबरीमध्ये चित्रित शिवनीती : एक अभ्यास<br>- डॉ. राहुल भालेराव पाटील | १९५ - १९९ |
| ५३. | शिवकालीन आरमार दल<br>- डॉ. भालेराव जी. पी. | २०० - २०१ |
| ५४. | छत्रपती शिवाजी महाराज चरित्र : सभासद बखर<br>- डॉ. वैशाली भालसिंग | २०२ - २०६ |
| ५५. | छत्रपती शिवाजी महाराजांचे सत्यशोधकीय विचार<br>- डॉ. जयदेवी पवार | २०७ - २१० |
| ५६. | शिवरायांच्या गोमंतक मोहिमेवर आधारित दर्जेदार नाट्याविष्कार : शिवगोमंतक<br>- डॉ. विनय मडगावकर | २११ - २१६ |
| ५७. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- डॉ. वैशाली बागूल | २१७ - २१९ |
| ५८. | छत्रपती शिवाजी महाराजांचे समकालीन शेतीविषयक धोरण<br>- डॉ. मारुती अर्जुन केकाणे | २२० - २२३ |
| ५९. | छत्रपती शिवाजी महाराज आणि गनिमी युद्धतंत्र<br>- प्रा. डॉ. प्रशांत प्रभाकरराव सराफ | २२४ - २२६ |
| ६०. | छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील अर्थनीती<br>- डॉ. विजय शंकर शिंदे | २२७ - २२९ |
| ६१. | छत्रपती शिवाजी महाराज एक साहसी व्यक्तिमत्त्व - एक ऐतिहासिक अवलोकन<br>- प्रा. रसाळ दशरथ किसन व प्रा. डॉ. विष्णू बी. वाघमारे | २३० - २३३ |
| ६२. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- डॉ. नीता र. तोरणे | २३४ - २३७ |
| ६३. | शिवाजी महाराजांच्या शेतजमीन मोजणीची वर्तमान काळात व भविष्यकाळात उपयुक्तता - प्रा. डॉ. बाबासाहेब गणपतराव देशमुख | २३८ - २४२ |
| ६४. | छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श प्रशासकीय धोरण<br>- प्रा. डॉ. यादव सूर्यवंशी | २४३ - २४६ |



# शिवरायांच्या गोमंतक मोहिमेवर आधारित दर्जेदार नाट्याविष्कार : शिवगोमंतक

- डॉ. विनय मडगावकर
मराठी विभाग, गोवा विद्यापीठ, गोवा
मो. ८३०८४७७६६४, ई-मेल : vinay@unigoa.ac.in

छत्रपती शिवाजी महाराजांचा गौरवशाली इतिहास कथा, कविता, कादंबरी, नाटक अशा सर्व साहित्य प्रकारांमधून कालानुक्रमे नवनवीन तथ्यांचा वेध घेत प्रस्तुत केला जात आहे. इतर साहित्य प्रकारांच्या तुलनेत नाटकांमधून सादर झालेली 'शिवगाथा' असंख्य रसिक प्रेक्षकांपर्यंत सहजपणे पोहोचली. काही नाटकांमध्ये मिथ्य आणि मिथक यांच्या आधारे निर्मित कल्पनारम्यता जाणवत असली तरी, बहुमतांशी नाटककारांनी पर्याप्त साधनांचा सजगपणे अभ्यास करून शिवकालीन इतिहासामधील नाट्यात्मक घटना-प्रसंग हेरून त्यांचे आपल्या साहित्यकृतीमधून विलोभनीय प्रस्तुतीकरण केले आहे. ऐतिहासिक साहित्यकृतीमध्ये प्राधान्य क्रमाने वास्तवदर्शी 'ऐतिहासिक मूल्य' सांभाळणे अनुस्यूत असते. यासंदर्भात गोमंतकातील प्रतिभासंपन्न नाटककार विष्णू सूर्या वाघ यांचे 'शिवगोमंतक' हे ऐतिहासिक नाटक अभ्यासनीय आहे. या नाट्याद्वारे लेखकाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'गोमंतक मोहिमेचा इतिहास' प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये 'शिवगोमंतक' या नाट्यसंहितेमधील कथानक पडताळून पाहण्यासाठी समर्पक प्रमाणांचा शोध घेत, ऐतिहासिक मूल्याचे विश्लेषण केले आहे.

**इतिहास आणि ऐतिहासिक नाटक -**

'इतिहास' हा ऐतिहासिक नाटकाचा मूलाधार असतो. वास्तविक ऐतिहासिक व्यक्ती आणि तिच्या अनुषंगाने घडलेल्या घटना-प्रसंगांचे वस्तुस्थितिदर्शक असे साधे सरळ सप्रमाण कथन म्हणजे इतिहास होय. याच ऐतिहासिक संस्मरणीय घटना-प्रसंगाच्या संरचनेवर, सर्जनशील नाटककार आपल्या प्रतिभेच्या बळावर नाट्यसृष्टीचा साज चढवतो. अशा नाट्यसंहितेत इतिहास आणि इतर साहित्यिक मूल्यांबरोबर सादरीकरणाचे मूल्यही अनुस्यूत असते. त्यामुळे ऐतिहासिक नाटकातील ऐतिहासिकता हे मूल्य, केवळ सत्य बनून राहत नाही, तर इतिहास आणि आभास यांच्यात सुमेळ साधत, सत्याचे सचेतन रूप धारण करून रंगभूमीवर आविष्कृत होते. गोमंतकीय नाट्यलेखक विष्णू सूर्या वाघ यांच्या 'शिवगोमंतक' या ऐतिहासिक नाटकात याचा प्रत्यय येतो.

**गोमंतकीय नाट्यकलेचा वारसा -**

गोमंतक ही संगीत नाटकांची उज्ज्वल परंपरा असलेली नाटककारांची आणि नाट्यरसिकांची भूमी. आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासात सुपरिचित असलेल्या अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्यावर झालेल्या, संत कृष्णंभट बांदकर यांच्या प्रभावासंदर्भात ज्येष्ठ संशोधक रा. चिं. ढेरे यांनी 'भारतीय रंगभूमीच्या शोधात' या ग्रंथात 'भक्ती आणि नाट्य' या पहिल्या प्रकरणात मांडलेले मत लक्षवेधी आहे. त्यांनी लिहिले आहे की, "कृष्णंभट बांदकरांसारख्या प्रतिभासंपन्न भक्तकवीची नाट्यकविता अभिनित झालेली पाहताना अण्णांचे नाट्यवेडे मन भारावले होते. नाट्यात्मक पुराणप्रसंगाची मोहिनी त्यांना जाणवली होती."[१] संत कृष्णंभट बांदकरांच्या पारंपरिक पौराणिक रंगभूमीची बलस्थाने जाणून घेऊन अण्णासाहेब किर्लोस्करांनी मराठी संगीत नाट्यनिर्मितीला प्रारंभ केला. संत कृष्णंभट बांदकर यांच्या डोंगरी गावात जन्माला आलेल्या विष्णू सूर्या वाघ यांच्या सिद्धहस्त लेखाणीतून साकारलेल्या अक्षरधनाने गोमंतकीय मराठी साहित्यसृष्टी समृद्ध झाली. त्यांचे 'शिवगोमंतक' हे एकमेवाद्वितीय असे ऐतिहासिक नाटक आहे. अत्याचारी पोर्तुगिजांपासून गोमंतभूमीच्या मुक्ततेसाठी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी हाती घेतलेल्या मोहिमांचा ऐतिहासिक आलेख विष्णू वाघ यांनी 'शिवगोमंतक' या नाट्यकृतीमध्ये सप्रमाण प्रस्तुत केला आहे. गोमंतकातील शिवशाहीवर आधारित हे पहिलेच नाटक होय.

**शिवरायांची गोमंतक मोहीम -**

सतराव्या शतकात इ. स. १६३० मध्ये शिवनेरीवर

शिवरायांचा जन्म झाला. त्याआधी सोळाव्या शतकात इ. स. १५१० मध्ये तिसवाडी-गोवा आदिलशहाकडून जिंकून घेतले आणि कालानुक्रमे राज्यविस्तार केला. पोर्तुगिजांनी आपली सत्ता सक्षम करण्यासाठी येथील जनतेचे बळजबरीने ख्रिस्तीकरण केले. गोमंतकीयांचा क्रूर छळ करत पोर्तुगिजांनी मंदिरांचा विध्वंस सुरू केला, धन, ऐश्वर्य, ग्रंथसंपदा लुटून नेली. 'Inquisition च्या आदेशानें कित्येकांना भयंकर यातना दिल्या, कित्येकांना जिवंत जाळले.'[२] निर्दयतेची परिसीमा गाठणाऱ्या अशा परदेशी पोर्तुगिजांविरुद्ध झुंज देणाऱ्या शिवशाहीचा महाराष्ट्रात उदय झाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची प्रतिष्ठापना केली. शिवकालीन बखरींमध्ये बहुतांशी बखरकारांनी आणि इतिहासकारांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध मोहिमांबरोबर गोमंतकातील फोंडा-गोवा या मोहिमेकडे अधिक लक्ष केंद्रित केले आहे. या मोहिमेत छत्रपती शिवाजी महाराजांनी आदिलशाही सैन्यासह पोर्तुगाली सैन्याशी झुंज दिली होती. गोमंतभूमीला पोर्तुगिजांपासून सोडवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती शंभूराजांची गोमंतक मोहीम ही धर्मकारण, राजकारण, अर्थकारण, समाजकारण या सर्व दृष्टींनी इतिहासात लक्षवेधी ठरली.

**'शिवगोमंतक' नाटक आणि ऐतिहासिक घटनाक्रम -**

पोर्तुगाली आफोंस-द-आल्बुकेर्कने आदिलशहाच्या सैन्याचा पराभव करून तिसवाडी-गोवा जिंकून घेतला होता. तद्नंतर बारदेश आणि सासष्टी हे प्रदेश आदिलशहाने पोर्तुगिजांना बहाल केले होते. गोमंतकीय जनतेच्या संरक्षणासाठी शिवाजी महाराजांनी गोमंतक मोहीम हाती घेतली होती. विष्णू वाघ यांच्या 'शिवगोमंतक' या ऐतिहासिक नाट्यकृतीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी याच शिवशाहीतील गोमंतक मोहिमांचा कथाशय मांडला आहे. या नाटकाच्या आरंभी लेखकाने ऐतिहासिक पार्श्वभूमी कथन केली असून, महत्त्वाच्या घटनांचा क्रम दिला आहे. त्यापैकी काही प्रसंग असे आहेत.

- ५ डिसेंबर १६६४ - छत्रपती शिवाजी महाराजांकडून सिंधुदुर्ग जिल्ह्याची पायाभरणी केली.
- मार्च १६६४ फोंड्याच्या किल्ल्याला शिवाजी महाराजांचा वेढा; पण मोहीम अयशस्वी.
- २९ ऑगस्ट आग्र्याहून सुटका.
- सप्टेंबर १६६७ धार्मिक छळाची परिसीमा, ख्रिस्ती न होणाऱ्यांना बारदेशातून हकालपट्टीचा पोर्तुगिजांचा आदेश.
- १९ नोव्हेंबर १६६७ शिवाजी महाराजांनी कोलवाळ बारदेश येथील पोर्तुगिजांवर हल्ला करून पोर्तुगिजांचा पराभव केला.
- १६ मे १६७५ शिवाजीराजांनी फोंडा किल्ला जिंकला. अंत्रूज, अंष्टाग्रार, हेमांडबार्शे, बाळ्ळी, चंद्रवाडी, काकोडे इत्यादी शिवाजी महाराजांनी आपल्या अधिपत्याखाली आणले.
- १२ नोव्हेंबर १६८३ छत्रपती संभाजी महाराजांनी फोंडा पुन्हा जिंकला.
- २४ नोव्हेंबर १६८३ छत्रपती संभाजी महाराजांचा जुवे बेटावर हल्ला.
- २६ नोव्हेंबर १६८३ मुघलांच्या आक्रमणामुळे छत्रपती संभाजी महाराजांची मोहीम अर्धवट राहिली.

या घटनांपैकी नाट्य सादरीकरणाचा विचार करून तद्रूप पात्र आणि प्रवेश यांची लेखकाने 'शिवगोमंतक' या नाटकासाठी निवड केली आहे.

**'शिवगोमंतक' नाटकातील पात्रे -**

इतिहासातील असंख्य घटना आणि व्यक्ती यांमधून नेमक्या व्यक्तींची निवड करण्याचे कौशल्य विष्णू वाघांकडे होते. 'शिवगोमंतक' या नाटकातील प्रमुख मुख्य पात्रे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आहेत. मैनावती, मायनाक, हंसाजी, बहिर्जी, अण्णाजी व्हिजरेई, पाद्री, लखमसावंत, इब्राहिम, मोहंमदखान, जनरल, फिरंगोजी, गागाभट्ट, राजाराम, सोयराबाई अशी मुख्य पात्रे आहेत. याव्यतिरिक्त ग्रामस्थ, महिला, शाहीर, मराठा सैनिक, मुसलमान सैनिक, पोर्तुगीज सैनिक, ब्रह्मवृंद, शाही मेहमान अशी इतर पात्रांची संख्या मोठी आहे.

**प्रयोगक्षम नाट्यसंहिता : शिवगोमंतक -**

ऐतिहासिक नाट्याद्वारे गतकालीन प्रसंगांचे तसेच तत्कालीन समाजाच्या वर्तनाचे, जीवनप्रणालीचे, भावभावनांचे अनुकरणात्मक प्रकटीकरण होत असते. ऐतिहासिक नाटककार प्रतिभवंत असावा, त्याचबरोबर तो इतिहासाचा सजग अभ्यासक असायला हवा. 'शिवगोमंतक' या ऐतिहासिक नाट्यलेखनावेळी विष्णू सूर्या वाघ यांनी बखर साहित्याबरोबर तत्कालीन पत्रव्यवहार आणि इतर ऐतिहासिक साधनांचा आधार घेतला असल्याचे जाणवते. आभासी असले तरीही

सत्य वाटणारे गोमंतकातील शिवशाहीचे कलात्मक रूप, दिग्दर्शक आणि कलाकारांमुळे नाट्यसृष्टीमध्ये अवतरते. विष्णू वाघ यांच्या कलात्मकतेमुळे 'इतिहास-शास्त्र', 'साहित्य-कला' आणि 'सादरीकरण मूल्य' यांचा संयोग 'शिवगोमंतक' या ऐतिहासिक नाटकात घडून येतो. प्रस्तुत नाट्यसंहिता सकस तशीच प्रयोगक्षम आहे.

**शिवरायांचा बारदेशमधील पोर्तुगिजांवर स्वारीचा निर्धार-**

'शिवगोमंतक' नाटकाच्या पहिल्याच प्रवेशात या तिसवाडी महालातील गावकरी महिला एकत्र येऊन मांडावर धालो गीते गाऊ लागतात. तेव्हा पोर्तुगीज सैनिक तेथे येताच महिला पळून जातात. उपस्थित पुरुषांना मार दिला जातो. दुसऱ्या प्रवेशात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाविषयी कुडाळचा लखम सावंत विजराईला माहिती देतो. 'शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात रयतेला त्रास देणाऱ्या या लखम सावंत याला पोर्तुगिजांनी बारदेश-गोव्यातील कोलवाळ किल्ल्यात आश्रय दिला होता.'[३] नाटकाच्या पुढच्या प्रवेशात 'कोंकणच्या वेंगुर्ले येथील समुद्रकिनाऱ्यावर शिवाजी महाराज हंसाजी आणि बहिर्जी यांच्यासमोर कुडाळ प्रांत जिंकल्याबद्दल मायनाकचा गौरव करतात. तेथेच महाराजांना बहिर्जीकडून गोव्यातील पोर्तुगिजांनी तेथील लोकांना बाटवायला आरंभ केल्याचे समजते.' तिसवाडीनंतर बारदेश प्रांत पोर्तुगिजांना आदिलशहाने केलेल्या तहामुळे सहज मिळाला होता. या प्रांतात ख्रिस्ती पंथप्रसार करण्याचे काम फ्रान्सिस्कन पंथीयांकडे होते. 'पोर्तुगीज विजराई कोंदी द संव्हिसेंती याने २१ सप्टेंबर १६६७ रोजी बारदेशमधील हिंदूंना दोन महिन्यांच्या मुदतीत एकतर ख्रिस्ती व्हा, अन्यथा बारदेश सोडून पोर्तुगीज हद्दीबाहेर निर्वासित व्हा; असा हुकूमनामा काढला होता. याचा उल्लेख त्यांच्या राष्ट्रीय ग्रंथालयातील हस्तलिखित नंबर ८५३८ मध्ये आहे.'[४] नाटकाच्या याच प्रवेशात हंसाजी आणि बहिर्जी यांना मिर्झाराजे जयसिंग हिंदवी स्वराज्यावर चाल करून येत असल्याचे सांगतात. वास्तविक 'गोव्याच्या गव्हर्नरने मिर्झाराजे जयसिंग यांना एप्रिल १६६७ मध्ये मराठ्यांच्या विरुद्ध मुघलांशी गोव्याचे आरमार सहकार्य करील, मात्र युद्धाचा खर्च मुघलांनी करावा असे कळवले होते.'[५] त्यामुळे आधी मिर्झाराजेंचा बंदोबस्त करून पुन्हा गोमंतभूमीच्या मुक्ततेसाठी येण्याचा विचार या प्रवेशाच्या शेवटी शिवाजी महाराज स्पष्ट करतात.

**शिवाजी महाराजांची गोव्यात भगवा फडकवला -**

पोर्तुगीज विजराईच्या "ख्रिस्ती व्हा, अन्यथा बारदेश सोडून पोर्तुगीज हद्दीबाहेर निर्वासित व्हा". या २१ सप्टेंबर १६६७ रोजी काढलेल्या हुकूमनाम्याची दोन महिन्यांची मुदत संपण्याआधीच शिवाजी महाराजांनी १९ नोव्हेंबर १६६७ रोजी रात्री कोलवाळ-बारदेश गावा येथील किल्ल्यात लपून बसलेल्या पोर्तुगिजांवर सशस्त्र सैन्यासह जोरदार स्वारी केली. महाराजांच्या नेतृत्वाखाली पराक्रमी मर्द मराठ्यांनी कोलवाळच्या किल्ल्यावर सहज विजय प्राप्त केला आणि त्यावर भगवा ध्वज फडकवला. घाबरलेल्या पोर्तुगिजांकडे तह करण्यावाचून आणखी पर्याय नव्हता. गोव्यातील ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रतिनिधीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या या गोमंतक मोहिमेचा उल्लेख दिनांक ३० नोव्हेंबर १६६७ रोजी कंपनीच्या मुख्य कचेरीला पाठवलेल्या पत्रात केला आहे. तो म्हणतो 'छत्रपती शिवाजी महाराज बारदेशमध्ये शिरले. त्यांच्या भयाने गोव्याच्या व्हाइसरॉयने हिंदू विरुद्ध काढलेला भयंकर हुकूम रद्द केला.'[६] ('English records on Shivaji', pg. 199) यावरून स्पष्ट होते, की भारतात राज्य करू पाहणाऱ्या इंग्रज आणि पोर्तुगीज या युरोपीय आक्रमकांना छ. शिवाजी महाराजांपासून आपणास धोका आहे, याची पूर्ण जाणीव होती.

**फ्रान्सिस्कन मिशनऱ्यांना कंठस्नान -**

नाटकाच्या पुढच्या प्रवेशात पाद्री जुवांव नोरोंज आणि पोर्तुगीज सैनिक मैनावतीला बाटवण्यासाठी ओढत नेत असताना मायनाक प्रवेश करतो. पाद्री आणि सैनिकांशी लढून मैनावतीला सोडवतो. नंतरच्या प्रवेशात छत्रपती शिवाजी महाराज हंसाजीसह प्रवेश करतात. सोबत मावळ्यांनी जेरबंद केलेला पाद्री जुवांव नोरोंज असतो. हिंदूंचे बळजबरीने ख्रिस्तीकरण करणाऱ्या पाद्री जुवांव नोरोंजला शिवाजी महाराज हिंदू हो असे सांगतात. ते न ऐकल्यामुळे महाराज त्याच्यासह इतर चार पाद्रींचा शिरच्छेद करण्याचा आदेश देतात. 'छत्रपती शिवाजीराजांचा पंथ स्वीकारल्याचे नाकारल्यामुळे त्यांचा शिरच्छेद केला.'[७] अशी नोंद बा. सी. बेंद्रे यांनी लिहिलेल्या शिवचरित्रात आहे. या संदर्भावरून प्रमाणित होते की, कोलवाळ बारदेशात लोकांचे ख्रिस्तीकरण करणाऱ्या फ्रान्सिस्कन मिशनऱ्यांना मराठ्यांनी मृत्युदंड दिला होता. हाच प्रसंग 'शिवगोमंतक' या नाटकात लेखकाने दर्शवला आहे.

**पोर्तुगिजांनी मान्य केलेला मराठी शर्तनामा -**

'शिवाजीराजे कोलवाळ बारदेश येथून २२ नोव्हेंबर १६६७ रोजी डिचोलीस गेले. कोलवाळ किल्ल्यात शिवाजी महाराजांच्या पराक्रमी सैन्याकडून झालेल्या पोर्तुगिजांच्या

दारुण पराभवानंतर तेथे आलेल्या विजरईने तातडीने छत्रपती शिवाजी महाराजांकडे आपला वकील रामजी शेणवी कोठारी यास डिचोली येथे तह करण्यासाठी पाठविले.'[८] पुढे या तहाच्या वाटाघाटी ५ डिसेंबरपर्यंत चालल्या व ६ डिसेंबर १६६७ रोजी तह झाला. प्रस्तुत तहातील पोर्तुगिजांनी मान्य केलेला शर्तनामा मराठी भाषेत होता.

**श्रीसप्तकोटेश्वर मंदिरनिर्मिती : शिवछत्रपतींची गोवामुक्तीची मोहीम -**

'शिवगोमंतक' नाटकात छत्रपती शिवाजी महाराज "गोव्यामधील आमचा उठाव श्रीसप्तकोटेश्वराच्या लिंगावर अभिषेकाने करू," असे बहिर्जीला सांगतात. नंतर श्रीसप्तकोटेश्वर शिवलिंगाची पूजा करताना शिवाजी महाराज दिसतात. वास्तविक ग्रँट डफ याने लिहिलेल्या 'मराठ्यांची बखर' या बखरीतील नोंदीनुसार विजापूरचा अली अदिलशहा आणि औरंगजेब यांच्यात 'इ. स. १६६८' मध्ये तह झाला. ग्रँट डफ पुढे लिहितो "त्यानंतर शिवाजीचे मनांत आले की, गोंवे एकाएकी छापा घालून घ्यावे; परंतु ते पोर्तुगीज लोक त्याची मसलत समजून सावध झाले."[९] प्रस्तुत बखरीत शिवकालीन घटनांचा नोंदवलेला कालक्रम अभ्यासल्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या गोव्याविषयीच्या शिवनीतीचा वेध घेता येतो. नार्वे गोवा येथील श्रीसप्तकोटेश्वर मंदिरातील शिवाजी महाराजांचा संस्कृत शिलालेख 'इ. स. १६६८' मधलाच आहे. यावरून शिवाजी महाराजांच्या नियोजनानुसार नार्वे येथील श्रीसप्तकोटेश्वर शिवमंदिर निर्मिती, हा गोमंतभूमीला पोर्तुगिजांपासून मुक्त करण्याच्या मोहिमेचा एक भाग होता, हे ऐतिहासिक प्रमाणांच्या आधारे स्पष्ट होते. पुढच्या प्रवेशात शिवराज्याभिषेकाची पूर्वतयारी आणि नंतरच्या प्रवेशात प्रत्यक्ष शिवराज्याभिषेक सोहळ्याला उपस्थित असलेली मैनावती छत्रपती शिवाजी महाराजांना गोमंतभूमीला स्वतंत्र करा, असे आवाहन करते. येथेच पहिला अंक संपतो. या नाटकातील मैनावती या पात्राशी संबंधित दर्शवलेले असे काही प्रसंग लेखकाची निर्मिती आहे.

**शिव-शंभूंच्या पराक्रमाचा साक्षीदार : फोंडा किल्ला -**

दुसऱ्या अंकाच्या आरंभी आदिलशहाकडून फोंडा किल्ला जिंकून घेण्याच्या मोहिमेची तयारी सुरू होते. मायनाक अंत्रूज महालातील गावकरी मंडळींना सहकार्य करण्यास प्रोत्साहित करतो. 'इतिहासानुसार छत्रपती शिवाजी महाराजांनी मार्च १६६६ मध्ये गोव्यातील फोंड्याच्या किल्ल्यास वेढा घातला होता. किल्ल्यातील विजापूरकरांना पोर्तुगिजांनी दारूगोळ्याची मदत केली. त्यामुळे फोंडा किल्ला जिंकता आला नव्हता. वेढा उठवून महाराज आग्र्यास औरंगजेबाच्या भेटीला गेले. ते मुघलांच्या कैदेतून निसटल्याचे वृत्त विजरई कोंदी द संव्हिसेंती यांनी पोर्तुगालच्या राजाला कळवले होते.'[१०] नाटकात तोच फोंडा किल्ला इब्राहिम, मायनाक, बहिर्जी आणि शिवरायांचे मावळे ज़िंकून घेतात. फोंड्याच्या किल्ल्यावर शिवशाहीचा भगवा फडकतो.

पुढच्या प्रवेशात छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर विजराई कोंदी द संव्हिसेंती फोंडा किल्यावर हल्ला करतो. इतिहासानुसार 'फोंडा किल्ला हस्तगत करण्यासाठी पोर्तुगीज व्हाइसरॉय कोंदी द आल्व्होर हा फोंड्याच्या किल्ल्याला वेढा घालण्याच्या उद्देशाने आगशीच्या मार्गाने २७ ऑक्टोबर १६८३ रोजी दुर्भाटला पोहोचला. त्याच्याबरोबर एक हजार दोनशे सहा पोर्तुगीज शिपाई व अडीच हजार गोव्याच्या साष्टीतील नवख्रिस्ती शिपाई होते. विजरईने सहा तोफा घेतल्या. अशी माहिती Relacao Verdadeira ह्या वृत्तान्तामध्ये आहे.'[११] त्यावेळी शंभूराजे राजापुरात होते. 'फोंडा गड घेण्यासाठी पोर्तुगीज सेना चाल करून जात असल्याचा वृत्तांत समजताच शंभूराजांनी क्षणाचाही विलंब न करता ९ नोव्हेंबर १६८३ रोजी मोजक्याच सैन्यासह फोंडा-गोव्याच्या दिशेने स्वारी केली.'[१२] छत्रपती संभाजी महाराजांनी गोमंतभूमीला मुक्त करण्याच्या निर्धाराने प्रबळ शत्रूवर प्रखर हल्ला चढवला. तेव्हा रणांगणावर शंभूराजांचा रुद्रावतार पाहून मराठ्यांच्या सैन्यात उत्साह संचारला, भयंकर युद्ध झाले. त्यात पोर्तुगाली सैन्याचा भीषण पराभव झाला.

**गोमंतभूमीच्या स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आवाहनाने नाट्यसांगता -**

कोंकणकाशी गोमंतकात छत्रपती शंभूराजे विजयी झाले. 'शंभूराजांचे पराक्रमी वीर सांत इस्तेव्हव, बारदेश, साष्टी या पोर्तुगिजांच्या सत्तेखाली असलेल्या गोमंतकीय मुलुखात शिरल्याने पोर्तुगिजांच्या तोंडचे पाणीच पळाले.'[१३] असा तत्कालीन पत्रांमध्ये उल्लेख सापडतो. २४ नोव्हेंबर १६८३ रोजी महाराजांनी पोर्तुगिजांकडून जुवे बेट (सांत इस्तेव्हव) जिंकून घेतले. चिडलेल्या पोर्तुगीज व्हाइसरॉयने सैन्य घेऊन २५ नोव्हेंबरला शंभूराजांवर हल्ला केला. तेथे झालेल्या घनघोर युद्धात पोर्तुगिजांचा पुन्हा एकदा भयंकर पराभव झाला. 'मराठ्यांच्या घोडदळाला भिऊन पोर्तुगिजांचे बरेचशे शिपाई

जीव वाचवण्यासाठी विजरईस सोडून खाली नदीच्या तीराकडे पळत गेले. याप्रसंगी संभाजीने गोवे शहरावर हल्ला करण्याचे योजले होते; पण नदीस भरती आल्यामुळे ते शक्य झाले नाही. भरतीच्या वेळी संभाजी छत्रपतींचा घोडा पहुणीस लागला असताना खंडो बल्लाळने स्वतःच्या जिवाची पर्वा न करता नदीत उडी टाकून महाराजांचे रक्षण केले.'[१४] 'पोर्तुगीज-मराठी संबंध' या ग्रंथात याचे सविस्तर विवरण आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आगमनानंतर स्वातंत्र्याचे स्वप्न पाहणारी गोमंतभूमी छत्रपती संभाजीराजांच्या परत जाण्याने पारतंत्र्यातच राहिली. मांडवी नदीला भरती आल्यामुळे शंभूराजांना नदी पार करता आली नाही. अन्यथा, २४ नोव्हेंबर १८८३ याच दिवशी छत्रपती संभाजी महाराजांनी पोर्तुगिजांना हाकलून गोमंतकात हिंदवी स्वराज्याचा भगवा फडकवला असता. इतिहासात अशा संभावनांना स्थान नसते. नाटकाच्या पुढच्या प्रवेशात जुन्या गोव्यातील जेजुईत पंथीयांच्या प्रार्थनागृहात लपून बसलेल्या विजराई तथा व्हाइसरॉय कोंदी द आल्वारूला जनरल रुद्रगीश शंभूराजांच्या पराक्रमाची वार्ता कथन करतो. शेवटी तो झेवियाराला शरण जातो. महाराष्ट्रात स्वराज्यावर शहजादा शहाआलमने आक्रमण केल्याने शंभूराजे माघारी फिरले; मात्र हा चमत्कार मानला गेला. वास्तविक छत्रपती शंभूराजांचा पराभव करण्यासाठी औरंगजेबाची मुगल फौज हिंदवी स्वराज्यावर चाल करून येत होती. 'मोगलांच्या मदतीने मराठ्यांचे पारिपत्य करून दक्षिण कोंकण हा प्रदेश गोव्याला जोडण्याचा पोर्तुगिजांचा मनसुबा होता. पोर्तुगिजांनी औरंगजेबाला तसे पत्र पाठवून कळवले होते.'[१५] शेवटच्या प्रवेशात मायनाक मैनावरतीचा निरोप घेतो. हातात तलवार घेऊन मैनावती गोमंतभूमीच्या मुक्तीसाठी शंभूमहादेवाचे आवाहन करते आणि नाटकाची सांगता होते.

**नाटकाची संरचना आणि भाषा -**

एखादी नाट्यसंहिता अनेकविध प्रयोगांमध्ये सादर करण्यास सक्षम असणे, हे त्या संहितेच्या श्रेष्ठतेचे लक्षण असते. यासंदर्भात विष्णू वाघ यांच्या नाट्यलेखनाविषयी नाट्यदिग्दर्शक तथा रंगकर्मी देवीदास अमोणकर नमूद करतात, "श्री विष्णूंच्या लेखणीतून अवतरलेल्या सर्व नाट्यसंहिता या प्रेक्षकांशी काही ना काही संवाद साधण्यासाठीच जन्मल्या आहेत, हे ठायी-ठायी जाणवत राहते. त्याचबरोबर समृद्ध आशय-विषय आणि प्रयोगक्षमता यामुळे सातत्याने दिग्दर्शक-कलाकार-तंत्रज्ञ यांनाही त्या नेहमी आव्हानात्मकच राहिल्या आहेत."[१६] त्याला 'शिवगोमंतक' नाटक अपवाद नाही. या नाटकात 'छत्रपती शिवाजी महाराजांची कोलवाळ-बारदेश येथील पोर्तुगिजांवरील स्वारी व छत्रपती संभाजी महाराजांची जुवे बेटावरील स्वारी.' या इतिहासाच्या पटातील दोन महत्त्वपूर्ण कालबिंदूंना प्राधान्य देत नाट्यसंरचना साकारली आहे. नाटकाची भाषा मराठी आहे. पोर्तुगाली पात्रांच्या संवादामध्ये 'वॉशिमेर्द, ओब्रिगात, विवा पोर्तुगाल, मोल्दाद, फिदाल्ग, कापोश्ताद, इस्तमोसांव, दिप्लॉमॉसांव' असे पोर्तुगीज शब्द येतात. तर मुसलमान पात्रांच्या संवादात 'शुक्रिया, हुजूर, अस्सलाम आलेकुम' असे उर्दू शब्द येतात. दर्जेदार प्रभावी संवादांबरोबर त्यातील सर्व काव्यरचनांमधून गोमंतकीयत्व आविष्कृत होताना दिसते.

फिरंग्याचे राजवटीत<br>
कोण सुखी आहे गे<br>
कोण सुखी आहे गे<br>
सुख गेले वनवासा<br>
भूमी आमची दुःखी गे<br>
भूमी आमची दुःखी गे

हे धालो गीत परंपरेने कोठेच धालांच्या मांडावर म्हटले जात नाही. हे खास नाटकासाठी रचले गेले आहे.

आसू पिऊनी रडते आहे महादायी माता<br>
आक्रमकांनी जखमी केला वाघेरी माथा

अशा हृदयस्पर्शी काव्याची पेरणीही लेखकाने आवश्यक त्याठिकाणी केली आहे. ग्रांथिक ओवी आणि वीररसात्मक पोवाडा या मराठमोळ्या काव्य प्रकारांचे समर्पक प्रस्तुतीकरण या नाटकातून होतेच. त्याचप्रमाणे गोमंतकातील धालो, धेंणलो, फुगडी, मोरुलो, तालगडी या लोककलांचे यथोचित उपयोजन करून लेखकाने या शिवकालीन नाट्यकृतीला गोमंतकीयत्वाचा साज चढावला आहे.

**समारोप -**

रंगभूमीवर प्रस्तुत होणारी लेखकाची नाट्यसंहिता, ही दिग्दर्शकाच्या कल्पनेतून कलाकारांच्या माध्यमाने, असंख्य प्रेक्षकांसमोर साकार होणारी चैतन्यमय नवनिर्मिती असते. 'शिवगोमंतक' ही अशीच प्रेक्षकांमध्ये चैतन्य निर्माण करणारी नाट्यकृती. या ऐतिहासिक नाटकात नाटककार विष्णू वाघ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी गोमंतभूमीच्या मुक्ततेसाठी हाती घेतलेल्या मोहिमांचा

कथाशय कथन करत असताना स्थानिक गोमंतकीयांनी केलेल्या सहकार्याचा आलेख मांडला आहे. प्रस्तुत ऐतिहासिक नाटकात इतिहास आणि कल्पना यांचा सुमेळ साधत गोमंतकीय लोककलांनाही प्राधान्य दिले आहे. नाटक सादर करताना दिग्दर्शक आणि कलाकार यांच्या कौशल्याचा कस लागतोच, त्याचबरोबर प्रेक्षकवर्गाही विचार करायला प्रवृत्त होतो, हे या नाटकाचे यश आहे.

**निष्कर्ष -**

- प्रेक्षकांसमोर रंगभूमीवर प्रस्तुत होणारी नाट्यसंहिता, ही दिग्दर्शकाच्या कल्पनेतून कलाकारांच्या माध्यमाने साकार होणारी नवनिर्मिती असते.
- 'शिवगोमंतक' या ऐतिहासिक नाटकात 'इतिहास-शास्त्र', 'साहित्य-कला' आणि 'सादरीकरण मूल्य' यांचा संयोग घडवून आणलेला आहे.
- श्रीसप्तकोटेश्वर मंदिरनिर्मिती, हा शिवरायांच्या नियोजनानुसार गोमंतभूमीला पोर्तुगिजांपासून मुक्त करण्याच्या मोहिमेचा एक भाग होता.
- विष्णू वाघ यांनी बखर साहित्याबरोबर तत्कालीन पत्रव्यवहार आणि इतर ऐतिहासिक साधनांचा आधार घेतला असल्याचे जाणवते.
- शिवराज्याभिषेक सोहळ्याला. मैनावती या पात्राची दर्शवलेले उपस्थिती, असे काही प्रसंग लेखकाची निर्मिती आहे.
- गोमंतकाच्या शिवकालीन इतिहासावर आधारित मराठी रंगभूमीवर साकारलेले हे पहिलेच नाटक आहे.
- लेखकाने लोककलांचे उपयोजन करून शिवकालीन नाट्यकृतीला गोमंतकीयत्वाचा साज चढवला.
- लेखकाने इतिहासाशी प्रामाणिक राहून आवश्यक त्याठिकाणी कलात्मक स्वातंत्र्य घेतले आहे.
- फोंडा किल्ला शिवछत्रपती आणि शंभूराजे यांच्या पराक्रमाचा साक्षीदार होता.
- नाटकातील बहुतेक प्रसंगांचे ऐतिहासिक प्रमाण प्राप्त झाले आहेत.
- विष्णू वाघ यांनी गोमंतकीय मराठी साहित्यसृष्टी समृद्ध केली.
- प्रस्तुत नाट्यसंहिता सकस तथा प्रयोगक्षम आहे.

**संदर्भ -**


१) ढेरे, रा. चिं., 'भारतीय रंगभूमीच्या शोधात', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पृ.११

२) Priolkar, A. K., 'The Goa Inquisition', Rajhans Publication, Goa, 1961, pg. 32

३) पिसुर्लेकर, पांडुरंग, 'पोर्तुगीज-मराठी संबंध', पुणे विद्यापीठ, पुणे, १९६७, पृ. ५९

४) तत्रैव. पृ. ५९

५) बेंद्रे, बा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सात्मक चरित्र', चेंबूर मुंबई, पृ. ४२१

६) 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने', संपा. ए. बी. ब्रागांस परेरा, अनु. स. शं. देसाई, साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र, १९६८, पृ. ११

७) बेंद्रे, बा. सी., 'श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सात्मक चरित्र', चेंबूर मुंबई, पृ.४४०

८) तत्रैव. पृ. ४४०

९) ग्रँट डफ्, अनु. डेव्हिड केपन, 'मराठ्यांची बखर', वरदा बुक्स, पुणे, २०१७, पृ. ६२

१०) पिसुर्लेकर, पांडुरंग, 'पोर्तुगीज-मराठी संबंध', पुणे विद्यापीठ, पुणे, १९६७, पृ. ५५

११) तत्रैव. पृ. ९५

१२) जोशी, मनोहर, 'गोमंतगाथा - भाग १', अक्षरमेघ प्रकाशन गोवा, २०१९, पृ. ८३

१३) शिवदे, सदाशिव, 'छत्रपती संभाजी महाराजांची पत्रे', स्नेहल प्रकाशन, पुणे, २०१५, पृ. ४३६

१४) पिसुर्लेकर, पांडुरंग, 'पोर्तुगीज-मराठे संबंध', उनी. पृ. १०५

१५) घोरपडे आनंद, 'स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी : समज-अपसमज', नाग-नालंदा प्रकाशन सांगली, २००५, पृ. १३८

१६) 'तिसऱ्या सहस्रकारंभी भारतीय नाट्य आणि नाटककार', संपा. प्रा. विनय मडगावकर, संत सोहिरोबानाथ आंबिये अध्यासन, गोवा विद्यापीठ, गोवा, २०२१, पृ. ११७


◆◆◆◆◆

